# ‘मेट्रो-३’ मार्गिकेवर पाच हजार कोटींच्या कामांची पूर्तता

**प्रतिनिधी/मुंबई** : कोरोनाकाळात अनेक महत्त्वाचे प्रकल्प रखडले. तर, काही प्रकल्प कासवगतीने सुरू होते; परंतु मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) कोरोनाकाळातही कामाचा सपाटा सुरू ठेवला आहे. एप्रिल २०२० पासून आतापर्यंत ‘मेट्रो-३’ मार्गिकेच्या पाच हजार कोटींच्या कामांची पूर्तता केली आहे. सद्यःस्थितीत ‘मेट्रो-३’ मार्गिकेवरील कामांना वेग आला आहे. बहुतांश कामे मार्गी लागली आहेत. मात्र, या कामांमध्ये कारशेडचा तिढा कायम आहे. त्यामुळे, या प्रकल्पाला विलंब होत असून खर्चातही वाढ होत आहे. दरम्यान, या मार्गिकेचा खर्च २३ हजार कोटींवरून ३३ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. आरे येथे ‘मेट्रो-३’च्या कारशेड उभारणीला पर्यावरणवाद्यांनी विरोध केला होता. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर हे कारशेड आरे येथून कांजूरमार्गला हलविण्याचा निर्णय सरकारने घेतला.